दैनिक मराठवाडा पत्र



# संविधानातील अधिकार आणि कर्तव्याच्या पालनाबरोबरच मूल्यांचा अंगीकार करावा: जिल्हाधिकारी विनय गौडा जी .सी

## महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीदिनी जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

भारतीय संविधानाने हक्काबरोबरच कर्तव्य दिली असून एक सुजाण नागरिक म्हणून संविधानाच्या 'उद्देशिकेमध्ये' मुख्य मूल्यांचा उल्लेख आहे यातील,न्याय,स्वातंत्र्य ,समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता या मूल्याचा अंगीकार करून त्याचे संवर्धन करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्त आयोजित कार्यक्रमात केले.

महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी.यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी जिल्हाधिकारी अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे,



उपनिवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, सामान्य प्रशासन विभागाच्या उपजिल्हाधिकारी संगीता राठोड , निवडणूक विभागाचे उपजिल्हाधिकारी देवेंद्र कटके, भूसंपादन विभागाचे उपजिल्हाधिकारी एकनाथ बंगाळे, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, रोहयो उपजिल्हाधिकारी रुपेश शिंगारे ,जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन, चरित्र आणि त्यांनी केलेल्या कार्याविषयीची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांनी सांगितली. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अमूल्य योगदान असून त्यांनी समानतेचा अधिकार संविधानाच्या माध्यमातून दिला. एकात्मता, बंधुभाव या मूलभूत तत्वाच्या अंगीकार व्यक्तीने संविधानाच्या माध्यमातून करण्याबाबत मार्गदर्शन केले. जगातील सर्वात मोठी लोकशाही आपल्या देशाची असून यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अमूल्य योगदान असल्याचे विधाते यांनी सांगितले.

## बालनाट्य-किर्तन कार्यशाळा मुलांच्या व्यक्तिमत्व विकासास पोषक: डॉ. अनिल चिंधे

### बलभीम महाविद्यालय व श्री विज्ञानेश्वर सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बालनाट्य-किर्तन कार्यशाळा उद्घाटन समारंभात प्रतिपादन

बीड । प्रतिनिधी

वर्तमान काळात शिक्षणासोबत विद्यार्थ्यांना विविध कौशल्ये आत्मसात असणे गरजेचे असून यासोबतच त्यांच्यामध्ये नैतिक मूल्य रूजवणे आवश्यक बनले आहे. या पाचदिवसीय कार्यशाळेतून विद्यार्थ्यांना नाट्यकौशल्य व नैतिक मूल्ये व संतविचारांचा परिचय होऊन त्यांचा व्यक्तिमत्व विकास साधला जाईल असे प्रतिपादन बलभीम महाविद्यालयाचे आय. क्यु.ए.सी.समन्वयक डॉ.अनिल



चिंधे यांनी केले. येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील नाट्यशास्त्र विभाग व श्री. विज्ञानेश्वर सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे शिदोड येथे प्राचार्य डॉ. संतोष उंदरे यांच्या मार्गदर्शनात पाचदिवसीय बालनाट्य-किर्तन व व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून या कार्यशाळेचा उद्घाटन समारंभ दि. १३ एप्रिल २०२६ रोजी पार पडला. यावेळी अध्यक्षस्थानावरून डॉ. अनिल चिंधे बोलत होते. मंचावर उद्घाटक म्हणून श्री. संत जांबुवंत कृपा आध्यात्मिक गुरूकुलचे संस्थापक ह.भ.प.आकाश महाराज म्हस्के, प्रमुख पाहुणे श्री. विज्ञानेश्वर सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प.कृष्णा महाराज वेताळ तर प्रमुख उपस्थितीत सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. रविंद्र काळे होते. आपल्या उद्घाटकीय मार्गदर्शनात ह.भ.प.आकाश महाराज म्हस्के म्हणाले की, या कार्यशाळेच्या माध्यमातून मुलांना शास्त्रोक्त ज्ञान मिळणार असून त्यांच्यातील कौशल्यांचा विकास होण्यास मदत होणार आहे. याप्रसंगी ह.भ.प.कृष्णा महाराज वेताळ म्हणाले की या पाच दिवसीय कार्यशाळेतून मुले आवश्यक ते विविध ज्ञान संपादनासोबतच नाट्य कौशल्य व नितीमूल्ये शिकतील ज्यातून त्यांच्या व्यक्तिमत्व विकासास मदत मिळेल. समारंभाच्या सुरूवातीस सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. रविंद्र काळे यांनी प्रास्ताविकातून कार्यशाळा आयोजनामागील भूमिका मांडली. या पाचदिवसीय कार्यशाळेस शिबिर प्रमुख व नाट्यशास्त्र विभागातील प्रा. केशव भागवत तसेच प्रा. प्रविण निसर्गंध हे मार्गदर्शन करणार आहेत. या उद्घाटन समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. केशव भागवत यांनी केले तर आभार प्रा. प्रविण निसर्गंध यांनी मानले.

## नृत्य-गीतांतून बाबासाहेबांना अभिवादन महेंद्र मुधोळकर यांनी व्यक्त केले मत

बीड । प्रतिनिधी

महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी उत्साहात साजरा होणारा जयभीम महोत्सव हा समाजासाठी प्रेरणादायी ठरत असल्याचे मत झी २४ तास वृत्तवाहिनीचे प्रतिनिधी महेंद्र मुधोळ यांनी व्यक्त केले. बीड शहरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्ताने जयभीम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. रविवारी (दि.१२) रोजी जयभीम महोत्सवाच्या निमित्ताने भव्य नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी अध्यक्ष स्थानावरुन महेंद्र मुधोळकर बोलत होते. यावेळी उदघाटक म्हणून लावणी प्रिन्स शुभम बोराडे, रवी वाघमारे, सुशिलाताई मोराळे आदी उपस्थित होते.भव्य नृत्य स्पर्धेचे प्रमुख अजय सवाई यांच्या नियोजनातून स्पर्धा पार पडली. महेंद्र मुधोळकर पुढे बोलताना म्हणाले जयभीम महोत्सवातले सांस्कृतिक कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी एक पर्वणी ठरत असून, महापुरुषांच्या विचारधारेवर आधारित गीतांद्वारे कवी व गायकांनी सामाजिक जागृतीचा प्रभावी संदेश दिला. तसेच या गीतांवर विविध

## सौ. के.एस.के. (काकू) अन्नतंत्र आणि कृषि महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



बीड । प्रतिनिधी

येथील सी. के.एस.के. उर्फ काकू अन्नतंत्र/कृषि महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती १४ एप्रिल रोजी साजरी करण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सहसचिव डॉ. गोविंद साळुंके उपस्थित होते. महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात बोलताना सांगितले की, डॉ. आंबेडकर यांनी बिकट परिस्थिती असताना बॅरिस्टर ही पदवी मिळवली पण आज आपल्या तरुणांकडे सर्व सुख-सोई, शिक्षणाच्या भरपूर संधी असतानाही कोणते शिक्षण घ्यावे याचे योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. कारण जिद्द, चिकाटी, शिक्षणाविषयीचे प्रेम आजच्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही. जिद्द, चिकाटी, शिक्षणाविषयी प्रेम निर्माण करा नक्कीच उद्या उच्चशिक्षित होऊन यशस्वी होताल. तसेच त्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताच्या मातीमध्ये जन्माला आलेलं अनमोल रत्न आहेत, वंचित अन उपेक्षित असलेल्या वर्गाला सन्मानाची जाणीव करून देण्याचे महान कार्य त्यांनी केलेले आहे. जगातील सर्वांत मोठी लोकशाही असणाऱ्या देशाचे संविधान लिहिण्याचे महान कार्य त्यांनी केलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व बहुमुखी होते. धर्मशास्त्राप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तत्कालीन सामाजिक व राजकीय प्रश्नावर आपले निर्भीड मत मांडले आहे महारांची वतन नष्ट व्हावी म्हणून त्यांनी विधिमंडळात कायदा करण्याचा प्रयत्न केला तसाच जनमत जागृत करण्यासाठी त्यांनी लेख भाषणे यांचा पाऊस पाडला. गरीब शेतकऱ्यांना खोतांच्या जाचातून सोडविण्यासाठी खोती निर्मूलन बिल त्यांनी मांडले. या त्यांच्या चळवळीत सर्व जातीचे धरमातील लोक देखील समाविष्ट होते ही बाब लक्षात घ्यायला हवी, महाविद्यालयात डॉ. आंबेडकर जयंती निमित्त सलग १८ तास अभ्यास उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमधे डॉ. आंबेडकर यांचे विचार रुजवण्याचे कार्य सतत सुरु आहे. असे वक्तव्य डॉ. गोविंद साळुंके यांनी केले. या प्रसंगी प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## बुद्ध विहारात धम्माचे संस्कार करून आदर्श समाज निर्माण करा: पूज्य भिक्खु धम्मशिल थेरो



बीड । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना धर्मातरांची घोषणा करून १४ ऑक्टोबर १९५६ साली नागपुर ममुक्कामी तथागत बुद्ध धम्माची दीक्षा घेऊन दया, क्षमा, शांती, करुणा व मैत्रीचा संदेश देणारा तथागतांचा धम्म दिला. तथागताच्या सद धम्माचा प्रसार व प्रचार करण्यासाठी दि.१३ एप्रिल सोमवार रोजी बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापणा व अनावरण सोहळ्यास पुज्य भिक्खु डॉ. इंदवंस्स महाथेरो (छ. संभाजीनगर), पुज्या भिक्खु धम्मशील थेरो (महाविहार धम्मभूमी शिवणी),पूज्य भिक्खु अश्वजित (छ. संभाजीनगर), पुज्य भिक्खु सुमेधबोधी (छ. संभाजीनगर) पुज्य भद्रेय (छ संभाजीनगर) यांच्या प्रमुख उपस्थितीत पालवन चौकापासून नागसेन बुद्ध विहारापर्यंत भव्य मिरवणूक काढून बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापणा करण्यात आली.पूज्य भिक्खु यांच्या वतीने उपासक-उपासिका यांना धम्मदेसना देण्यात आली. बुद्ध मूर्तीच्या प्रतिष्ठापणा प्रसंगी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, प्रा.प्रदीप रोडे, सुशिलाताई मोराळे, अॅड भगवान कांडेकर, शितलकुमार सुकाळे, अजय सवाई, प्रा.विठ्ठल गाडे, यांनी आपले मनोगत व्यक्त केले.बुद्ध मूर्तीच्या प्रतिष्ठापना प्रसंगी पूज्य भिक्खु धम्मशिल थेरो म्हणाले की, डॉ.आंबेडकरांनी समाज बांधवाना

## मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे मातोश्री ग्रामीण रुग्णालयात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, बीड यांच्या वतीने 'मातोश्री ग्रामीण रुग्णालय' गाव काठोडा ता.जि.बीड येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न, ज्ञानाचा अथांग जनसागर असलेल्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती अतिशय उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली.



या जयंती उत्सवाच्या निमित्ताने रुग्णालयाच्या आवारात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर दीपप्रज्वलन करून महामानवास विनम्र अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना उपस्थित वक्त्यांनी डॉ. बाबासाहेबांच्या अफाट कार्यावर प्रकाश टाकला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका समाजाचे नव्हे तर संपूर्ण मानवजातीचे उद्धारकर्ते होते. ते एक चालता-बोलता जनसागर होते, ज्यांच्या विचारांच्या लाटेने देशातील शोषित, वंचित आणि तळागाळातील माणसाला न्याय मिळवून दिला. त्यांनी लिहिलेल्या राज्यघटनेमुळेच आज आपला देश लोकशाहीच्या भक्कम पायावर उभा आहे, अशा शब्दांत मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

सामाजिक बांधिलकीचा वारसा जपत, मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने हा उत्सव केवळ एक सोहळा न ठेवता, समाजप्रबोधनाचे माध्यम बनवले. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष, सर्व पदाधिकारी, मातोश्री ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी, परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी 'जय भीम'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून सोडला. कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शनाने झाली.

# स्वयंपाकघरातील मसाल्यांत दडलंय आरोग्याचं गुपित; आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचे 'वनस्पती शिबिर' उत्साहात

### ३६० नागरिकांनी घेतला लाभ ; ८० पेक्षा जास्त औषधी द्रव्यांचे प्रदर्शन

बीड । प्रतिनिधी

आपल्या स्वयंपाकघरात रोज वापरले जाणारे जिरे, धने, मिरे आणि हिंग हे केवळ चव वाढवणारे पदार्थ नसून ते आरोग्याचे रक्षक आहेत, हा संदेश 'आदित्य आयुर्वेद महाविद्यालया'च्या वतीने आयोजित शिबिरातून देण्यात आला. आदित्य शिक्षण संस्थेचे संस्थापक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय माध्यमिक विद्यालय, सारडा पार्क येथे शनिवार दि. ११ एप्रिल रोजी 'स्वयंपाकघरातील औषधी वनस्पती' या विषयावर भव्य शिबिर पार पडले. या प्रदर्शनाचा बीडमधील ३६० नागरिकांनी लाभ घेतला. ८० पेक्षा जास्त औषधी द्रव्यांचे प्रदर्शन विद्यार्थ्यांनी भरवले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा तर प्रमुख पाहुणे म्हणून अन्न सुरक्षा अधिकारी अजय गाढे, अंकुश नरवाडे आणि सिद्धार्थ चव्हाण हे उपस्थित होते. त्यांनी अन्न सुरक्षा आणि औषधी वनस्पतींचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य, शाळेच्या मुख्याध्यापिका आणि संस्थेच्या विविध विभागांचे प्राचार्य उपस्थित होते. अंकुश नरवाडे (अन्न सुरक्षा अधिकारी) यांनी बोलताना



सांगितले कि,केवळ आजारी पडल्यावर उपचार करण्यापेक्षा, स्वयंपाकघरातील वनस्पतींचा वापर करून आरोग्य कसे टिकवावे, हे या शिबिराने शिकवले आहे, असे अन्न सुरक्षा अधिकारी सिद्धार्थ चव्हाण म्हणाले. आदित्य शिक्षण संस्थेने अशा सामाजिक उपक्रमातून सर्वसामान्य नागरिकांशी जोडलेली नाळ ही शहराच्या आरोग्यासाठी अत्यंत आश्वासक आहे.

केवळ आजारी पडल्यावर उपचार करण्यापेक्षा, स्वयंपाकघरातील वनस्पतींचा वापर करून आरोग्य कसे टिकवावे, हे या शिबिराने शिकवले आहे, असे अन्न सुरक्षा अधिकारी सिद्धार्थ चव्हाण म्हणाले. आदित्य शिक्षण संस्थेने अशा सामाजिक उपक्रमातून सर्वसामान्य नागरिकांशी जोडलेली नाळ ही शहराच्या आरोग्यासाठी अत्यंत आश्वासक असल्याचे सिद्धार्थ चव्हाण (अन्न सुरक्षा अधिकारी) यांनी यावेळी नमूद केले.

विद्यार्थ्यांचा सहभाग आणि जनजागृती

या प्रदर्शनास सुमारे ३६० नागरिकांनी भेट देऊन आरोग्याविषयीची शंकांचे निरसन करून घेतले. महाविद्यालयातील २०० विद्यार्थ्यांनी या शिबिराचे नियोजन आणि माहिती देण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवला. या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न मिळता, प्रत्यक्ष लोकसंवाद साधल्यामुळे व्यवहारी ज्ञानाचाही अनुभव आला. कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली, द्रव्यगुण विभागाच्या प्राध्यापिका डॉ. मयुरी शिंदे-करंडे, प्रा. रामेश्वर ढोबळे आणि इतर शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले.या उपक्रमामुळे बीड शहरात घरगुती औषधी वनस्पतींबाबत मोठी जागरूकता निर्माण झाली असून, आयुर्वेदाचा वारसा घराघरात पोहोचवण्यास मदत झाली आहे.

आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचा उपक्रम कौतुकास्पद : अजय गाढे (अन्न सुरक्षा अधिकारी)

आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश घराघरात पोहोचवण्यासाठी आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाने राबवलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आणि काळाची गरज आहे, असे गौरवोद्गार अन्न सुरक्षा अधिकारी अजय गाढे यांनी काढले. ते म्हणाले केवळ पुस्तकी ज्ञान न देता, विद्यार्थ्यांनी स्वयंपाकघरातील ८० हून अधिक वनस्पतींचे प्रत्यक्ष स्टॉल्स लावून सर्वसामान्यांना दिलेली माहिती ही कौतुकास्पद बाब आहे. धने, मिरे, केशर, हिंग यांसारख्या दैनंदिन पदार्थांचे औषधी महत्त्व पटवून देण्यात आदित्य कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी घेतलेली मेहनत शहरासाठी भूषणावह आहे. संस्थेचे संस्थापक सुभाषचंद्रजी सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली हे महाविद्यालय सामाजिक आरोग्यासाठी जे कार्य करत आहे, ते खरोखरच वंदनीय आहे.

२०० विद्यार्थ्यांनी दिली औषधी गुणधर्माच्या फायदे तोट्याची माहिती

शिबिरात मुख्य आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी लावलेले ८० पेक्षा अधिक माहितीपूर्ण स्टॉल्स. यामध्ये केवळ वनस्पतीच नव्हे, तर दैनंदिन वापरातील महत्त्वाच्या द्रव्यांचा समावेश होता. त्यामध्ये धने, मिरे, चिंच, केशर, जायफळ, लसूण, तेजपत्ता, बडीशेप, गवती चहा, कोकम. दही, ताक, हिंग आणि मध यांसारख्या पदार्थांचे औषधी गुणधर्म काय आहेत हे प्रत्येक स्टॉलवर विद्यार्थ्यांनी येणाऱ्या नागरिकांना त्या वनस्पतीचा उपयोग, सेवन करण्याची शास्त्रीय मात्रा (डोस), त्याचे फायदे आणि अतिवापराचे तोटे याबद्दल सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी मांडलेल्या या 'जिवंत प्रयोगशाळे'ने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● बुधवार दि. १५ एप्रिल २०२६ ●



*माहमानव, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष बीड जिल्हयाच्या वतीने बीड शहरातील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करताना शिवसेना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर, समवेत तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन, उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, नुतन इंग्लिश स्कूल चे संचालक जमील बागवान सर*



*भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती ऋतढ कृषीकुल येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. संस्थेचे ट्रस्टी संजय परमार यांनी डॉ.बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थितांनीही पुष्पांजली अर्पण करत आपल्या भावना व्यक्त केल्या.*




*बीड: येथील सेवादल मैदानावर जयभीम महोत्सवानिमित्त आयोजित भव्य संगीत रजनी कार्यक्रमात युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या हस्ते सुप्रसिद्ध गायक अनिरुद्ध वनकर यांचा सत्कार करण्यात आला; यावेळी राजू जोगदंड व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.*

## युवा सेना जिल्हा प्रमुख गणेश भैय्या शिराळे यांच्या नेतृत्वाखाली...

# आंबेडकर जयंतीनिमित्त शीतपेय वाटप

**बीड । प्रतिनिधी**

वंदन महामानवाला संविधानाच्या शिल्पकाराला या घोषवाक्याखाली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त युवा सेना बीड जिल्ह्याच्या वतीने शीतपेय वाटपाचा उपक्रम उत्साहात पार पडला.

हा उपक्रम उपमुख्यमंत्री तसेच शिवसेना चे मुख्य नेते एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, युवा सेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरणीयक यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच बाळासाहेब ठाकरे व आनंद दिघे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन राबविण्यात आला. तसेच शिवसेना जिल्हा प्रमुख अनिल दादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांचे मार्गदर्शन लाभले.



या कार्यक्रमाचे आयोजन युवा सेना जिल्हाप्रमुख गणेश (भैय्या) शिराळे यांच्या नेतृत्वाखाली निलेश थोरात यांनी केले.

उष्णतेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना दिलासा मिळावा या उद्देशाने मोठ्या प्रमाणात मोफत शीतपेय वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला युवा सेना तालुका अध्यक्ष महेश कदम पाटील, त्यानंतर युवा सेना शहर संघटक निलेश थोरात पाटील, तसेच शिवसेना शहर प्रमुख ऋषिकेष जोगदंड, उपशहर प्रमुख तेजस आप्पा शेटे, तसेच अमृत (काका) सारडा, धीरज राऊत, सुरज बेद्रे, आकाश लोकरे, निखिल शेटे, शंतनू मोरे, शिवम होनराव, सुधांशू मोरे, महेश वडमारे, अजिंक्य वाढमारे, वैभव वाढमारे, अथर्व मस्के यांच्यासह शिवसैनिक व भीम सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## शांताई अर्बनमध्ये भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या शांताई अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून बीड येथील सुप्रसिद्ध डॉ. कोळेकर सर, तसेच मुक्ताई फार्मचे रामदासी सर, ग्रामसेवक राहुल वीर सर व शाहू बोराडे सर (माजी सैनिक) उपस्थित होते. त्यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी बोलताना डॉ. कोळेकर सर यांनी



सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्त्वज्ञ आणि महान समाजसुधारक होते. त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा देत सामाजिक समतेसाठी आयुष्यभर संघर्ष केला. तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉ. डी. बी. शिंदे सर यांनी आपल्या मनोगतात म्हटले की, महिला व कामगारांच्या हक्कांसाठी त्यांनी नेहमीच आवाज उठवला. भारताचे पहिले कायदे मंत्री तसेच भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून त्यांचे योगदान अमूल्य आहे.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष डॉ. डी. बी. शिंदे सर, उपाध्यक्ष श्री. संदीप वाघमारे सर तसेच शांताई अर्बनचे कर्मचारी, पिग्मी प्रतिनिधी व खातेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी परमपूज्य विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## प्रतिगाम्यांना रोखण्यासाठी संविधान मूल्य जपावे : प्रा. कमलाकांत काळे



**बीड । प्रतिनिधी**

प्रतिगामी विचारसरणींना रोखण्यासाठी संविधानातील न्याय, स्वातंत्र्य आणि समता या मूल्यांचे जतन करणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रा. कमलाकांत काळे यांनी केले.

बीड शहरात जयभीम महोत्सव अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चंद्रप्रकाश शिंदे होते. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, डी. जी. वानखेडे, सुभाष पौळ, विजय खोसे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, जर यशस्वी क्रांती घडवायची असेल, तर संविधानातील न्याय, स्वातंत्र्य आणि समता या मूल्यांवर दृढ विश्वास असणे गरजेचे आहे. चळवळीत त्यागाची परंपरा असल्यामुळे समाज आजही सुरक्षित आहे, असेही त्यांनी नमूद केले.जयंती उत्सव केवळ साजरे करण्यापुरते न राहता ते प्रेरणा, प्रबोधन आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करणारे असावेत.

## बाजार समिती कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी



**माजलगाव । प्रतिनिधी**

कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयामध्ये दिनांक १४ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सह. सचिव रवींद्र नाईक नवरे मोतीराम चव्हाण सुनील सवणे, बुद्धभूषण टाकणखार, अतुल होके विष्णू दुगाने, अरुण ठोंबरे, सिद्धेश्वर येवले, आनंत इरमले, पांडू आगे, प्रशांत सोळंके, करण लोढा,आप्पा पौळ, महादेव सोनटक्के, मन्मथ शेजुळ, गणपत कदम, नितीन पोळ, कैलास ढगे कृष्णा गायगावे, अंगद गांधले, अशोक माळी इत्यादी उपस्थित होते.

## माजलगावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमीत्त प्रेरणादायी उपक्रमाची सुरूवात – भाजपा नेते ज्ञानेश्वर मेंडके यांचा पुढाकार

**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमीत्त पंडित दीनदयाळ उपाध्याय शहर स्वच्छता अभियानाची सुरूवात भाजपा नेते ज्ञानेश्वर नाना मेंडके यांच्या पुढकारातुन करण्यात आली.



या अभियानाचे नारळ वाढवून विधीवत उद्घाटन भाजपा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष केशव उपाध्ये यांच्या हस्ते करण्यात आले. या अभियाना अंतर्गत शहरातील विवीध ठिकाणी शहर स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. यावेळी आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्रचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे, जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, अरूण राउत, डॉ. अशोक तिडके, शहराध्यक्ष विनायक रत्नपारखी, नगरसेवक दिपक मुंडे, अभय होके, नारायण मेंडके,ज्ञानेश्वर पवार, कैलास खुर्पे, भरत जोशी, रवी गायकवाड, उमेश जाधव, दत्ता जाधव, जक्की इनामदार यांचेसह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान भाजपा नेते ज्ञानेश्वर मेंडके यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराला प्रेरीत असा उपक्रम हाती घेत समाज परिवर्तनाच्या विचारांना कृतीत उतरवरत स्वच्छ, सुंदर शहर घडविण्याचा हा स्त्युत्य प्रयत्न असल्याचे उपस्थितांनी सांगीतले.

## मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेमार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त मोफत नाश्ता वाटप

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या अनुषंगाने सामाजिक बांधीलकी जपत 'मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, बीड' यांच्या वतीने शहरातील मुख्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे भाविकांसाठी मोफत नाश्ता वाटप करण्यात आले. (१४ एप्रिल)२०२६ सकाळपासूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात महामानवाला अभिवादन करण्यासाठी अनुयायांची आणि नागरिकांची मोठी गर्दी उसळली होती. जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून तसेच ग्रामीण भागातून आलेल्या



नागरिकांची गैरसोय होऊ नये, या उदात्त हेतूने मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.

याठिकाणी अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या शेकडो नागरिकांना व महिलांना शिस्तबद्ध पद्धतीने नाश्ता व पिण्याच्या पाण्याचे वाटप करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार कृतीत उतरवत, गोरगरीब व सामान्य जनतेची सेवा करण्याच्या उद्देशाने संस्थेने हा उपक्रम आयोजित केला होता. या अन्नदान व नाश्ता वाटप कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी 'मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्थे'चे अध्यक्ष सौ.छाया दिलीप पवार , सर्व पदाधिकारी, सदस्य आणि स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. संस्थेने राबवलेल्या या सामाजिक उपक्रमाचे बीड शहरातील नागरिकांची सोय करण्यात आली.

## श्री नारायण विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथे श्री नारायण मा. व उच्च माध्यमिक विद्यालयात भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्रथम विद्यालयात संस्थेचे अध्यक्ष मा. महादेवराव काळे आण्णा यांच्या हस्ते भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन केले. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव तथा प्राचार्य अमोल काळे सर, पत्रकार अजय कारंडे, परमेश्वर रुपनर,अतुल कारंडे (बीड जिल्हा उपाध्यक्ष टायगर ग्रुप), सचिन कारंडे, प्रा. अशोक घरत सर, प्रा. श्री पौळ सर, दामोदर काळे, प्रा. श्री मस्के जी.बी,श्री मुरमुडे ए .एन, प्रा. रकटे पि. आर, श्रीमती काळे मॅडम, श्रीमती भुतावळे मॅडम, श्रीमती मस्के मॅडम, श्रीमती जगताप मॅडम , श्री शेख सर,श्री करपे सर, श्री इनकर बी.जे, श्री रकटे बी. आर,श्री चौधरी पी. बी, श्री रकटे एन. पी,कदम एस .व्ही, श्री पवार पी .एल, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लिंबागणेश येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात

### उत्सव समिती अध्यक्षपदी रावसाहेब निर्मळ तर उपाध्यक्षपदी सुरज कदम

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त मंगळवारी ग्रामपंचायत कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून श्रीफळ फोडण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते. प्रास्ताविक भिम टायगर ग्रुपचे जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ



यांनी केले, तर सूत्रसंचालन आरूण निर्मळ यांनी केले. आभार प्रदर्शन सुरेश निर्मळ यांनी मानले. प्रा. लेनाजी गायकवाड यांनी आपल्या भाषणात डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्यायावर आधारित समाजव्यवस्था उभी करण्यासाठी दिलेला शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा हा मूलमंत्र आजही मार्गदर्शक असल्याचे प्रतिपादन केले. यावेळी माजी सरपंच बाळासाहेब मुळे, पत्रकार हरिओम क्षीरसागर, ग्रामपंचायत सदस्य रमेश गायकवाड, पोपट निर्मळ यांचीही भाषणे झाली. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीची निवड जाहीर करण्यात आली. अध्यक्षपदी रावसाहेब निर्मळ, उपाध्यक्षपदी सुरज कदम, सचिवपदी तुकाराम गायकवाड, कोषाध्यक्षपदी तुळशीराम पवार यांची निवड करण्यात आली. सल्लागार म्हणून माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, डॉ.गणेश ढवळे, साहेबराव निर्मळ,डिगांबर निर्मळ, बाळकृष्ण थोरात, अँड.गणेश वाणी,जितेंद्र निर्मळ, दामोदर थोरात, दादा गायकवाड, सुरेश ढवळे,बापू थोरात, शफीभाऊ यांची नियुक्ती करण्यात आली असून सदस्य म्हणून औदुंबर नाईकवाडे, पप्पू आवसरे, शंकर वाणी, अमोल निर्मळ, रिंकू निर्मळ, सुमेध निर्मळ, स्वप्निल निर्मळ, अमोल वक्ते, बन्सी निर्मळ, संदीप निर्मळ, बालाजी निर्मळ, प्रमोद निर्मळ, प्रकाश निर्मळ, कैलास गायकवाड, श्रीमंत निर्मळ, रोहन आवसरे आदींचा समावेश आहे.

कार्यक्रमात लिंबागणेश येथील भूमिकन्या पायल प्रमोद निर्मळ हिची महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाल्याबद्दल तिचा सहकुटुंब सत्कार करण्यात आला. समाज प्रबोधनात्मक उपक्रमांद्वारे भिमजयंती साजरी करण्यात येणार असल्याची माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली. तसेच ग्रामपंचायतीच्या वतीने नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.